**पद्यपाठ 6- पडघवली**
**लेखक : गो.नी. दांडेकर**
**ठळक मुद्दे**

- **पाठाचे नाव – पडघवली** –(येथे क्लिक केल्यास जोडणी लिंकमध्ये पुढील माहिती उपलब्द्ध होईल )लेखक-गो नी दांडेकर (hyperlink to short note on दांडेकर), प्रसिद्ध कादंबरीकार (१९१६-१९९८) मूळ लेखन संदर्भ-'पडघवली' कादंबरी.
- **पात्र**:
    - ✓ खोतीण म्हणजे वहिनी-आधीच्या पिढीची प्रतिनिधी, पडघवलीच्या ऱ्हासाची साक्षीदार, संवेदनशील, हळवी, मदत करणारी.
    - ✓ गणूभावजी- वहिनीचे दीर.
    - ✓ काल्या- गावातील व्यक्ती
    - ✓ चिंगी नवलकरीण
    - ✓ कीर्तनकार
    - ✓ अतिथी
- **पाठाचा विषय**- कोकणातील एक गाव, गावातील तरुणांच्या मुंबईस स्थलांतरामुळे गावाला आलेले रिकामेपण, ओस पडणाऱ्या बागा, घरे व शेती. निसर्गाचा ऱ्हास, ह्याला जबाबदार दैव आणि माणूस अशी वहिनींची समज. मागे राहिलेल्या खोतीणीला गावाविषयी वाटणारी काळजी.
- **पाठाचे वैशिष्ट्य**: कोकणी बोलीचे दर्शन, निसर्ग चित्रण आणि पात्रांची मानसिक अवस्था ह्यांच्या वर्णातून आशय पुढे जातो, सूचक प्रसंग आणि घटनांचा वापर उदा. वादळाची शक्यता व धुक्याचे गावात पसरणे.

**प्रस्तावना:**

पडघवली हे कोकणातील एक गाव. बहुतांश ब्राह्मण वस्तीचे हे गाव. या गावाच्या पडझडीचे शब्दचित्र गो. नी. दांडेकर 'पडघवली' या कादंबरीतून मांडतात. या कादंबरीच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतात की *'कारखाने आणि उद्योगधंदे यांचे केंद्रीकरण (एकाच ठिकाणी गोळा होणे) झाल्यामुळे खेड्यातील नवसर्जनशील (नवीन निर्मिती करू शकणारे) मनुष्यशक्तीचे शहरात जे विलीनीकरण (एका गोष्टीचे दुसऱ्या गोष्टीत सामावून जाणे) होत आहे ते भयानक आहे.'* ह्याला कारण प्राचीन व्यवस्था ढासळली आहे,ग्रामसंस्था उद्ध्वस्त झाल्या आहेत. पूर्वापार चालत आलेले व्यवसाय सोडून नवीन व्यवसाय माणसे शोधत आहेत. ह्या बदलात गाव, तेथील माणसे, जुनी घरे, बागा, शेती ह्यांच्या दुरावस्थने लेखकाचे मन व्यथित होते. पडघवली ह्या पाठातून ही व्यथाच वहिनींच्या म्हणजे खोतीणीच्या नजरेतून आपल्यासमोर येते.

गो नी दांडेकरांच्या विषयी अधिक वाचन करण्यासाठी पुढील लिंक पहा-

http://archive.prahaar.in/relax/44508.html

**पाठाचा आशय:**

पाठाच्या सुरुवातीच्या वाक्यांतूनच सूचित होते की गावतील पुरुषमाणसे पोटापाण्याच्या कामासाठी शहरात म्हणजे मुंबईला जात असावीत. मागे राहिलेल्या कुटुंबाला आपला सांभाळ आपणच करावा लागतोय. खोतीण हे पात्र अशाच मागे राहिलेल्या मोजक्या लोकांपैकी आहे. काल्याच्या सूनेच बाळंतपण करून येताना खोतीण पडघवली गावाला निरखत येते. त्यावेळी खोतीण म्हणजे वहिनींना ,स्वत:ची पिढी आणि त्यांच्या पुढची पिढी अशी तुलना केल्याशिवाय राहावत नाही. एकाच पिढीत, त्यांच्या डोळयादेखत गावात झालेले बदल त्यांना सुन्न करून सोडतात. बागा ओसाड झालेल्या, घरं उजाडलेली, पह्यात पाणी ओसरून हत्ती एवढे दिसणारे दगड, ठोसर बागेच गेलेलं वैभव, हे सगळ त्यांना दु:खी करते.

वहिनींना गावाची व निसर्गाची गेलेली रया बघून घाबरायला होते. तसेच त्यांच्यासोबत गाव सोडून गेलेल्या माणसांची आठवण देखील त्यांना दु:खीकष्टी बनवते उदा. शारदा,यदोनाना. ह्यांना शेवटचे भेटताही आले नाही हे दु:ख वाहिनीना खूप बोचणारे आहे. जोशी,ठोसर, दत्तूअण्णा, दामूअण्णा आणि अंबूनाना ही माणसं, पडघवलीच्या ओसाडपणात शेवटची टिकलेली माणस. पण त्यांचाही निभाव फार काळ लागेल असे नाही. बरीच माणसं आपला संसार गुंडाळून गाव सोडून जातानाचे दृश्य वहिनींना दिसत आहे. ही आता कायमची जाणार हे त्याना माहीत आहे आणि त्यामुळे वहिनींच्या जीवाची घालमेल होत आहे. पडघवलीची अशी दशा होईल असे वहिनींना स्वप्नातही वाटलेले नाही.

**पुढे चालू:**

गावात माणसच नावाला उरत आहेत असं चित्र असताना घरी अतिथी म्हणून येणाऱ्या कीर्तनकारबुवांच वहिनी स्वागत करतात. कीर्तनकार पडघावालीची ख्याती ऐकून आलेले. परंतु अनेक वर्षानी आलेल्या कीर्तनकारबुवांना आजच्या उजाड पडघावालीची कल्पना नाही. गणूभावजी आणि वहिनी दोनच माणसं घरात आहेत. अशापरिस्थितीत अतिथीने घरात येणे ही घटना वाहिनीना दु:खावर फुंकर घालण्यासारखी वाटते.

वहिनी त्यांचे आदरातिथ्य करतात,एकाकीपणा थोडातरी कमी होईल ह्या हेतूने त्यांना आणखी काही दिवस राहण्याची विनंती करतात. परंतु वहिनी त्यावर एक सूचक वाक्य बोलतात 'बुवा, तुम्हाला उशीर झाला'. म्हणजे आता गावात कीर्तन ऐकायला माणसच नाहीत तेव्हा कीर्तन कोणासमोर करणार असा प्रश्न त्या उभा करतात.

कीर्तनकारबुवानाही कोकणात फिरताना हा बदल जाणवला आहे. 'कुठं म्हणून तरुण चेहरा काही दिसेना' असं वाक्य ते बोलतात. ह्याचं कारण मुंबई! जी रामायणातील ताटका राक्षसिणीप्रमाणे कोकणाला खाते आहे असं ते

देतात. कोकणाची ही अवस्था आता सगळयांना कळेल असं वाहिनीना वाटून जाते व त्या आणखीच चिंतीत होता. ऐकणारे ऐकतील व नंतर सोडून देतील पण ही दुर्दशा बघणारे व भोगणारे हे कसे विसरणार?

**पाठाला उठावदार करणारे घटक:**

आतापर्यंत आपण पडघवली पाठाचा आशय वाचला. या आधी मूळपाठ तुम्ही वाचला असेलच. वाचताना त्यातील उदासीन, दु:खी भाव तुमच्या लक्षात आला का? एकाकीपणाची भावना, दु:ख, गावाबद्दलची आपुलकी, भविष्याबद्दलची भीती, थोडक्यात विविध प्रकारच्या भावभावना, एकत्रितपणे, कथा कादंबरीतून मांडता येतात. कारण कथा कादंबरी हे वर्णन करणारे साहित्य प्रकार आहेत व अशा वर्णनासाठी लेखक/लेखिका कल्पनेचा आधार घेतात.

वाचकाच्या मनाला कथा कशामुळे भिडते? तर विविध पात्र, स्थळे, घटना त्यात येतात. जसे पडघवली पाठात एक निवेदक (वाहिनी) आहे जो आपल्याला त्याच्यासोबत पडघवलीचे दर्शन घडवतो आणि आपण ह्या निवेदकाच्या दृष्टीतून पडघवली पाहू शकतो. दर वेळी असा निवेदक कथेत असेल असे नाही. परंतु पडघवली ह्या पाठच्या संदर्भात आपण विचार करू. आपल्याला आलेला अनुभव वाचकापर्यंत जिवंतपणे पोचवणे व त्या अनुभवाविषयी त्याचे काय म्हणणे आहे हे देखील समजावे यासाठी लेखक किंवा लेखिका काय करतात? तर तो अनुभव थेट शब्दांत न मांडता, वेगवेगळया प्रतिकांमधून, सूचक वाक्यरचनेतून, एखाद्या घटनेचं वर्णन करून, पोचवतात. त्यांना अपेक्षित असलेल्या भावना वाचकांत निर्माण कशा होतील ते पाहतात. इथेच त्यांचे खरे कौशल्य असते.

पडघवली ह्या पाठात वहिनींना येणाऱ्या आठवणी व त्यांचे गणूभावजी व कीर्तनकार ह्यांच्याशी झालेले संभाषण प्रत्यक्ष रुपात समोर येते. परंतु त्या संभाषणात व आठवणीत असलेले दु:ख ठळक होते ते उजाड बागा आणि पडझडलेली घरे, धुके,धूर आणि वादळ अशा निसर्गातील घटकांमुळे, जी पाठात प्रतिकांप्रमाणे येत राहतात.

वरील सर्व घटक पडघवलीची विपन्नावस्था वर्णन करतात. धुक्याचे पसरणे, समोरचे न दिसणे, माणसांचे चेहरे धूसर होणे आणि फक्त आवाज ऐकू येणे ह्यातून एक भीतीदायक चित्र उभे राहते. शिवाय माणसांत व गावात तयार होणारा दुरावाही दर्शवते. भविष्य अस्पष्ट असणे किंवा पुढे काय होणार ह्याची कल्पनाही करता न येणे, असा ही अर्थ धुक्याच्या अस्तित्त्वातून सूचित होतो. ह्यापुढे जाऊन 'जौळ' म्हणजे वादळाची शक्यता वर्तवणे हे देखील सूचक आहे. पोटापाण्याचा विचार करताना माणसाने त्याच्या भूमीचा, ज्या जमिनीवर तो वाढला-जगला तिचा विचार केला नाही. त्यामुळे माणसा माणसातील संबंधही तुटलेले आहेत. माणूस पोटाचा विचार करता करता स्वार्थी बनला आहे. ह्याचा शेवट म्हणजे आता गावावर ओढवलेले आरिष्ट गावाला बुडवून जाणार म्हणजे थोडक्यात गावे ओस पडणार, संपणार असा संकेत वादळातून मिळतो व ही भीती लेखक वादळाच्या रूपाने मांडू पाहतो.

पाठाचे वाचन त्यतील सूचक शब्द, वारंवार येणारे उल्लेख व पात्राची त्यावरील प्रतिक्रिया अशा क्रमाने केले तर पाठाचे सौंदर्य, त्यातील विचार, भावना आणि लेखकाचे मत आपल्याला ओळखता येऊ शकते.

**लेखकाचा दृष्टिकोन**

लेखकाला लिहितो कारण त्याला मानवी जीवनाबद्दल काहीतरी तीव्रतेने जाणवलेले असते व त्याला ते प्रगट करायचे असते. जसे पडघवली पाठात खेड्याचा विध्वंस माणसाने केलाय आणि त्याला थोड्याप्रमाणात दैवही कारणीभूत आहे असे लेखकाला जाणवते . लेखकाचे नव्या बदलाविषयीचे मत वहिनी ह्या पात्रामार्फत, तिच्या संभाषणातून, आठवणीतून व निसर्गात होत राहणाऱ्या बदलातून सूचित होत राहते. हा दृष्टीकोन समजला की आपल्याला लेखकाला काय म्हण्याचे आहे हे समजले असे म्हणता येईल.

**भाषाशैली**

आता ह्या पाठातील भाषेविषयी तुम्हला वेगळेपणा जाणवला का? नक्कीच जाणवला असेल. कोकणात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना तो अधिकच जाणवला असेल. कारण कोकणातील बोलीचे दर्शन आपल्याला ह्या पाठ्तून घडते. *देत्ये, जात्ये, डोल्यात, गं,* अशी कोकणी बोली व त्यातील साम्बोध्के येथे वापरली आहे ज्यातून एक गोडवाही निर्माण होतो. आजूबाजूच्या परिस्थितीचे वर्णनही छोट्या आणि सूचक वाक्यांमधून होते. *सड्याची उतरण,अम्बुडी,आवसा,जौळ* असे अनेक प्रादेशिक शब्ददेखील ह्या पाठातून आपल्याला वाचायला मिळतात.

**वहिनींची स्वभाव वैशिष्ट्ये:**

ह्या पाठात वहिनींचे स्वभाव वैशिष्ठ्य प्रामुख्याने आलेले आहे. पडघवालीचा ऱ्हास पाहणारी ती एक प्रमुख साक्षीदार आहे. गावात राहायला माणसं हवीत त्यांच्याशिवाय गावात राह्यला ओकंबोकं आणि सुनं वाटतं हे त्यांना येणाऱ्या आठवणीतून स्पष्टपणे पुढे येते. एका बाजूला त्या हळव्याही आहेत. उतरत्या वयात त्यांना त्यांच्या भावना लपवणे जडही जाते.  परंतु दुसऱ्या बाजूला वाहिनी संवेदनशील आहेत तश्याच धीराच्या आहेत. आपल्या चेहऱ्यावर मात्र आपले दु:ख किंवा चिंता त्या दर्शवत नाहीत. आपले विचार आणि भावना मनात साठवून ठेवणाऱ्या आहेत.

**<u>स्वाध्याय:</u>**

**<u>उजळणी प्रश्न:</u>**

पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१ पडघवली हा पाठ समोर ठेवा. त्यातील पान २१ वरील पहिली ५ ते ६ वाक्ये वाचा. वेळ, स्थळ आण.ि पात्र ह्यांच्याविषयी काय सूचित होते?

२ घरांची व बागांची पडझड का झाली आहे?

३ कीर्तनकार मुंबईला ताटका राक्षसीण का म्हणतात?

पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१ धुक्याविषयी वहिनी सतत का विचार करत आहेत?

२ कोकणातून मुंबईस लोकांच्या झालेल्या स्थलांतरामुळे कशाकशावर आणि कसा परिणाम झाला आहे?

३ ब्राह्मणवाड्याकडे पाहून वहिनींना गहिवरून का येते?

संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

"आता एखद्या बाईचे केस गळावे नि इवलीशी अंबुडी यावी हाताला तसं झालाय "

"नि धुक्याचे डोंगरच्या डोंगर पडघवलीवर कोसळताहेत "

**<u>मुक्त प्रश्न:</u>**

**१.पुढे काही मुद्दे व स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याच्या आधारे , मुद्द्यांना आधार देणारी पाठातील वाक्ये शोधा -**

**कथेतील निवेदन-** (निवेदक करतो-स्वत:विषयी व इतरांविषयी करतो ते)

**वर्णन-** ( आजूबाजूच्या गोष्टींचे,निसर्गाचे, मनस्थितीचे)

**पात्र-**(ज्याच्या विषयी कथा आहे, जे पात्र घटना/प्रसंगात सहभागी आहे, मुख्यपात्राशी संवाद साधणारे, परिणाम करणारे)

**घटना-** (कथेत घडणारी, कथेला पुढे नेणारी, कथेवर परिणाम साधणारी)

**परिणाम-** (जो वाचकाच्या मनावर होतो, लेखकाला जो साधायचा असतो, सुरुवातीपासून शेवटापर्यंत लेखक वेगवेगळया प्रकारे तो साधतो उदा. भाषाशैली, प्रतीके, कथेचा शेवट, अचानक घडणारी घटना इ.)

२. **पडघवली कादंबरी वाचयला प्रेरित करणारे पत्र आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला लिहा.**

**३. तुमच्या गावात किंवा शहरात गेल्या २/३ वर्षात झालेले बदल तुमच्या शब्दांत मांडा.**